
# बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक ३१ | बुधवार, दि.०८ ते १४ जुलै २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# हिरकणी कक्ष बांधकाम घोटाळा पोहोचला विधिमंडळात

**गोंदिया:-** राज्य सरकारच्या महिला व बालविकास विभागाच्यावतीने जिल्हा वार्षिक योजनेतून विविध शासकीय व निम्म शासकीय कार्यालयात स्थापीत करण्यात येत असलेल्या हिरकणी कक्ष बांधकामात मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याचा गैरप्रकार साप्ताहीक बेरार टाईम्सने उघडकीस आणला होता. या गैरव्वहार संदर्भात प्रकाशीत वृत्ताची दखल राज्यातील अनेक आमदारांनी घेतली असून विधानसभेत लक्षवेधीच्या माध्यमातून तर विधान परिषदेत पांईट ऑफ इंन्फारमेशन अंतर्गत सरकारला प्रश्न







विचारले आहे. हिरकणी कक्ष बांधकामात राज्यातील विविध जिल्ह्यात वेग-वेगळे दर ठरवून टेंडर असलेल्या कंत्राटदारांनी शासकीय निधीची लूट केल्याची दिसून येते. त्यातच राज्यातील बहुतांश जिल्ह्यात महारालक्ष्मी इंटरप्राइजेस, श्रीपाद्र इंटरप्राइजेस व महिला औद्योगिक सहकारी संस्था यांचे संगणमत दिसून येत असून सर्वाधिक कामे महालक्ष्मी इंटरप्राइजेस या पुरवठादाराला दिल्याचे दिसून येत आहे. त्यासोबतच ठरविलेले साहित्य हिकरणी कक्षात न बसविता कमी दर्जाचे गुणवत्ताहिन साहित्य बसविले गेल्याचे पाहणी दरमिण्याण आढळून आले. सोबतच अनेक कार्यालयात सव्वा सहा लक्ष रुपये किंमतीचे केबीन बेपत्ता असल्याचे तसेच प्लॉस्टीकची खुर्ची जी १०००,१२०० ला मिळते ती खुर्ची ३०-३४ हजारापर्यंत खरेदी केल्याचे दिसून आले आहे. या सर्व साहित्य खर-ेदी गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी विधानसभेत आमदार बापूसाहेब पठारे, अशोकराव माने, डॉ. राहूल पाटील, सुधीर मुनगंटीवार, संतोष दानवे, इंजि.राजकुमार बडोले, शेखर निकम व समाधान आवतारे यांनी केली आहे.तसेच विधान परिषदेतही आमदारांनी हिरकणी कक्ष बांधकामाच्या कंत्राट निविदेसंदर्भात चौकशीची मागणी केली आहे.

### वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार

**भंडारा:-** तुमसर तालुक्यातील गोबरवाहीच्या जंगलालगत वाघाच्या हल्ल्यात एका गुराख्याचा मृत्यू झाला. बेनीराम राऊत असे मृताचे नाव आहे. बेनीराम जंगलालगत जनावारांना चराईसाठी घेऊन गेले होते. दरम्यान दबा धरुन बसलेल्या वाघाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला.

# कर निर्धारण विभागातील स्लॅबचेही प्लास्टर कोसळले; सुदैवाने अनर्थ टळला

**गोंदिया:-** नगर परिषद उपमुख्याधिकाऱ्यांच्या दालनातील खिडकीचे प्लास्टर पडल्याची घटना शुक्रवारी (दि.३) घडल्यानंतर आता मंगळवारी (दि.७) कर निर्धारण विभागातील स्लॅपचे प्लास्टर उखडून पडले. सकाळी हा प्रकार घडला असून सुदैवाने यावेळी तेथे कुणी नसल्याने काही धोका झाला नाही. मात्र, नगर परिषद कार्यालयातील पडझड सुरूच असल्याने कर्मचाऱ्यांत भीतीचे वातारण पसरले आहे.

नगर परिषद कार्यालयातील इमारत जीर्ण झाली असून कित्येक वेळा इमारतीचे प्लास्टर पडल्याच्या घटना घडल्या आहेत. पावसाळ्यात तर जागोजागी पाण्याची गळती होत असून भिंती पाण्याने तर्रर झाल्याचे उघड दिसून येते. यामुळे इमारतींचे बांधकाम किती दर्जेदार झाले हे आता समजून येत आहे. अशातच शुक्रवारी (दि.३) उप मुख्याधिकारी भुमेश्वरी झलके यांच्या दालनातील खिडकीचे प्लास्टर उखडून पडले. हा प्रकार बघून मुख्याधिकाऱ्यांनी लगेच जुन्या इमारतीमधील सर्वच विभागांचे कार्यालय इंदिरा गांधी स्टेडियममध्ये हलविण्याचे आदेश काढले आहे.



स्थानांतरणाची तयारी केली जात असतानाच मंगळवारी (दि.७) कर निर्धारण विभागातील स्लॅपचे प्लास्टर उखडून पडले. सकाळी १०:३० वाजता दरम्यान हा प्रकार घडला असून त्यावेळी तेथे कुणी उपस्थित नसल्याने अप्रिय घटना घडली नाही, अन्यथा एखाद्याच्या डोक्यावर पडून काही दुखापत झाली असती यात शंका नाही. विशेष म्हणजे, कर विभागाचे कार्यालय असलेली ही इमारत सुरक्षित समजली जात असतानाच आता तेथे हा प्रकार घडल्याने कर्मचारी मात्र दहशतीत आले आहेत.कर्मचारी जीव मुठीत घेऊन करतात कामे

नगर परिषदेच्या मुख्य कार्यालयीन इमारतीची स्थिती अत्यंत जीर्ण झाली असून कित्येकदा इमारतीचे प्लास्टर उखडून पडले आहे. त्यात शुक्रवारी उपमुख्याधिकाऱ्यांच्या दालनात हा प्रकार घडला, तर आता दुसऱ्या इमारतीतील कर निर्धारण विभागात मंगळवारी प्लास्टर पडले. त्यानंतर जुन्या कर विभागाच्या इमारतीचा एक भागच पडल्याने ती इमारत पूर्णपणे रिकामी करण्यात आली आहे,

तर मागे हिंदी टाऊन स्कूलमध्येही कित्येकदा प्लास्टर उखडून पडल्याचे प्रकार घडले आहेत. एकंदर नगर परिषद इ?मार-तींची स्थिती यातून दिसून येते. या प्रकारांमुळे मात्र कर्मचारी दहशतीत असून त्यांना जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे

# महाज्योतीच्या कमी केलेल्या जागा पूर्ववत करा

## सकल ओबीसी महामोर्चाची मागणी; जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

गोंदिया :-ओबीसी समाजाच्या प्रलंबित न्याय्य मागण्यांवर तत्काळ निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी येथील सकल ओबीसी महामोर्चा व ओबीसी अधिकार मंचाने केली आहे. याबाबतचे निवेदन उपजिल्हाधिकारी मानसी पाटील यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर मागास (ओबीसी) बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांना पाठविले आहे.

राज्यात ओबीसी समाजाची अचूक संख्या समोर यावी यासाठी जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी, ओबीसी समाजाला लोकसंख्येच्या



प्रमाणात अर्थसंकल्पात निधी उपलब्ध करून द्यावा, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणात शंभर टक्के शिष्यवृत्ती लागू करून वसतिगृह प्रवेश प्रक्रिया तत्काळ सुरू करावी, महाज्योती संस्थेला आवश्यक निधी उपलब्ध करून देत संस्थेच्या विविध प्रशिक्षण योजनांमधील कपात केलेली विद्यार्थी संख्या रद्द करून विद्यार्थ्यांना पूर्ववत संख्येनुसार लाभ द्यावे,ओबीसी वसतिगृहाची प्रवेश प्रकिया तातडीने सुरु करण्यात यावे असे निवेदनात नमूद आहे.

उपजिल्हाधिकारी मानसी पाटील यांना निवेदन देताना खेमेंद्र कटरे, कैलाश भेलावे, सुनील भोंगाडे, निखिल बन्सोड, गौरव बिसेन, राजकुमार पटले, भुमेश शेंडे, नरेश परिहार, प्रेमलाल साठवणे, रवी भांडारकर, कमल हटवार उपस्थित होते.

### ...अन्यथा तीव्र आंदोलन

**ओबीसी समाजातील विद्यार्थी, शेतकरी तसेच युवक आर्थिक आणि सामाजिक अडचणींना सामोरे जात आहे. त्यामुळे समाजाच्या न्याय्य मागण्यांवर शासनाने वेळीच ठोस पावले उचलावी, अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा सकल ओबीसी समाजाने दिला आहे.**

# भूमिगत मार्ग नको, उड्डाण पूलच हवा


**गोंदिया:-** गोंदिया-चंद्रपूर रेल्वे मार्गावरील कुंभारनगर, लक्ष्मीनगर, सिग्नल वॉर्ड परिसरात रेल्वे विभागाकडून भूमिगत पुलाचे काम सुरू आहे. मात्र, याला या परिसरातील नागरिकांनी तीव्र विरोध केला आहे. भूमिगत पुलाए-ेवजी या ठिकाणी उड्डाणपूल मंजूर करण्यात यावा, अन्यथा या विरो-धात तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा येथील नागरिकांनी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात धडक देत दिला. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी मंदार पत्की यांना देण्यात आले.

गोंदिया शहरातील कुंभारे नगर, लक्ष्मी नगर, सिग्नल टोली व सावित्रीबाई फुले वॉर्ड हा परिसर पूर्णपणे बंदिस्त झालेला आहे. मुंबई-हावडा आणि गोंदिया चंद्रपूर या दोन्ही रेल्वे मार्गांनी या संपूर्ण वस्तीचा परिसर दोन्ही बाजूंनी वेढला आहे. सद्यःस्थितीत अस-लेला भूमिगत मार्ग पूर्णपणे निकामी ठरला आहे. मुंबई-हावडा रेल्वे मार्गावरील भूमिगत मार्ग निकृष्ट दर्जाचा आहे. पावसाळ्यात त्यात पूर्ण पाणी भरते, गाळ साफ होत नाही, आरसे नाहीत. यामुळे या ठिकाणी नियमित अपघात होत आहेत. तसेच रात्रीच्या वेळी या भूमिगत पुलाखाली चोरी, लूट, हाणामारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. रात्री महिलांसह सर्व नागरिकांना या मार्गावरून जाणे अत्यंत धोकादायक झाले आहे. नवीन भूमिगत पुलामुळे पूर्ण नाकेबंदी होणार आहे, गोंदिया चंद्रपूर रेल्वे मार्गावर नवीन सबवे झाल्यास परिसर दोन्ही बाजूंनी पूर्णपणे बंदिस्त होईल. शिवाय याचा आपत्कालीन सेवांवर आणि शैक्षणिक वाहतुकीवर गंभीर परिणाम होतील.

# वाहतूक कोंडी फुटणार! नागपूरच्या धर्तीवर गोंदियात उभारणार एलिव्हेटेड सर्कल फ्लायओव्हर

**गोंदिया :-** शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी, तसेच अपघातांना आळा घालण्यासाठी आ. विन-ोद अग्रवाल यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे बाला-घाट टी-पॉइंट ते कुडवा येथील साईबाबा राइस मिलपर्यंत ३ किमी लांबीच्या उड्डाणपूल बांधकामाची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बालाघाट टी-पॉइंट ते कुडवा या ३ किमी लांबीच्या उड्डाणपूल बांधकामास मंजुरी दिली आहे. सध्या या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल

तयार करण्याचे काम सुरू आहे. तसेच मागील चार वर्षांपासून रावणवाडी-कामठा-आमगाव मार्गाचा राष्ट्रीय महामार्गाच्या धर्तीवर विकास करण्याची आ. विनोद अग्रवाल यांची मागणीही शासनाने मान्य केली आहे. या



२९ किलोमीटर लांबीच्या महाम ार्ग प्रकल्पासाठी २९० कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. गोंदियात उभारण्यात येण-ारा हा फ्लायओव्हर नागपूरच्या एलिव्हेटेड रोटरी ब्रिजच्या

धर्तीवर असणार आहे. हा एलिव्हेटेड सर्कल फ्लायओव्हर शहरातील प्रमुख चौक आणि रस्त्यांना उंच स्तरावर जोडण्याचे काम करील. प्रस्तावित आराखड्यानुसार बालाघाट टी-पॉइंट येथे गोलाकार (एलिव्हेटेड सर्कल) रचना करण्यात येणार असून, येथून कुडवा मार्ग, जिल्हाधिकारी कार्यालय मार्ग, नागरा रोड, हड्डीटोली पूल व मरारटोली पूल मार्ग हे एकमेकांशी जोडले जाणार आ-हेत. वाढता वाहतूक ताण आणि वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर या उड्डाणपुलाची उभारणी ही काळाची गरज बनली आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर दासगाव मार्गावरील वाहतुकीसाठी पर्यायी बायपास जोडणी उपलब्ध होईल, त्यामुळे शहरातील वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होणार असल्याचे आ. विनोद अग्रवाल यांनी सांगितले.

# "गोबरधन" प्रकल्प चुकीच्या ठिकाणी; स्वच्छता विभागाच्या रहमतकरसह तिघे दोषी!

## चौकशी समितीचा ठपका ; तीन महिने लोटूनही कार्यवाही करण्यास टाळाटाळ, जिल्हा परिषद सदस्य संजय टेंभरे यांनी काढले प्रकरण

**गोंदिया:-** पाणी व स्वच्छता विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणारे "गोबरधन" प्रकल्प ग्राम पंचायती ऐवजी नगरपरिषद हद्दीत चुकीच्या ठिकाणी कार्यान्वित केल्याप्रकरणी स्वच्छता विभागाचे कंत्राटी कर्मचारी रहमतकर यांच्यासह इतर दोघांना प्राथमिक चौकशीत दोषी ठरवण्यात आले आहे. हे प्रकरण जिल्हा परिषद सदस्य संजय टेंभरे यांनी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीत केले उचलून धरले होते. यात पाणी व स्वच्छता विभागाचे रहमतकर यांच्यासह तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता,तसेच ग्रामपंचायत पिंडकेपारचे ग्रामपंचायत अधिकारी यांचा समावेश आहे. याप्रकरणी दोषींवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कोणती कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या माध्यमातून जिल्ह्यात जनावरांची संख्या जास्त असलेल्या एका गावाची निवड करून त्या गावांत ङ्गगोबरधनङ्ग प्रकल्प राबविण्याच्या सूचना होत्या. शेतकऱ्यांच्या जनावरांची संख्या जास्त असेल तर गोबर चे प्रमाण जास्त राहील व प्रकल्प सुरू झाल्यास त्याचा फायदा हा शेतकऱ्यांसह गावातील नागरिकांना होणार, असा ङ्गगोबरधनङ्ग प्रकल्पाचा उद्देश होता. मात्र पाणी व स्वच्छता विभागाचे वतीने सदर प्रकल्प हा मनमर्जीप्रमाणे पिंडकेपार जवळील श्रीकृष्ण गोरक्षण सभा येथे राबविण्यात आल्याचे दिसून येत आहे.

प्रकल्प मंजुरीच्या वेळी तांत्रिक बाबी व जागा निश्चिती करण्याच्या वेळेस जागा ग्रामपंचायत हद्दीत येते किंवा नाही, याची पडताळणी पाणी व स्वच्छता विभागाचे स्वच्छता तज्ञ रहमतकर यांनी सदर जागेबाबतची सर्व कागदपत्रे प्रत्यक्ष स्थळी पाहणी



करून याबाबत अहवाल विभागाला व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देणे अपेक्षित होते. परंतु पाणी व स्वच्छता विभागाने ग्रामपंचायत पिंडकेपार यांचेकडून श्रीकृष गोरक्षण सभा पांजरपोळ ही जागा ग्रामपंचायत पिंडकेपार च्या हद्दीत असल्याचे ग्रामपंचायतच्या मासिक सभेच्या दिनांक २९/०३/२०२३ रोजीच्या समिति ठराव क्रमांक ४(३) अन्वये मंजूर करून घेतला व याबाबत ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र घेतलेले आहे. परंतु जागा ही पिंडकेपार ग्रामपंचायत हद्दीत येत नसल्याचे अह-वाल गोंदिया नगरपरिषदेने दिलेला आहे.प्रकल्पाची एकूण किंमत ही ४५,७२,४१९/- रुपये इतकी होती. यापैकी प्रथम धा-वते देयक २२,३२,५६५/- रुपये, द्वितीय धावते देयक १४,६४,७५६ /- रुपये असे एकूण ३६,९७,३२१/- रुपये अदा करण्यात आले असून ८,७५,०९८/- रुपये अद्यापही खर्च करण्यात आलेले नाही.

यांप्रकरणी गठित करण्यात आलेल्या समितीचे प्रमुख अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे यांच्यासह पंचायत समिती गोंदियाचे गटविकास अधिकारी जितेंद्र देवरे व उपअभियंता (जि.प.व सा. बां. उपविभाग गोंदिया) शैलेश गायधने यांनी दिलेल्या चौकशी अहवालानुसार, सदर ङ्गगोबरधनङ्ग प्रकल्प ग्रामपंचायत हद्दीत करणे अपेक्षित असतानाही नगर परिषद हद्दीत झालेला आहे. यासाठी संबंधित पाणी व स्वच्छता विभागाचे तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी व स्वच्छता तज्ञ रहमतकर हे प्रथमतः दोषी आढळून येत आहेत. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीच्या हद्दीत सदर गट क्रमांक नसताना सुद्धा ग्राम पंचायतीचे ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत ठराव मंजूर करून घेवून नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे. परंतु मासिक सभेच्या ठरावामध्ये ग्रामविकास अधिकारी यांनी आ-पले स्वतःचे कायदेशीर मत मांडले नाही, त्यामुळे संबंधित ग्रामविकास अधिकारी प्रशासकीय कारवाईस पात्र असल्याचा निर्णय दिला आहे. त्यामुळे आता कंत्राटी कर्मचारी असलेल्या रहमतकर सह इतरांवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कडक कार्यवाही करतात की त्यांना वाचवतात, हे पाहणे गरजेचे आहे.

# जिल्हा परिषद विकास आराखडा प्रशिक्षण उत्साहात

## १६ वा वित्त आयोग,सर्वसमावेशक आराखडा निर्माण करण्याचे ध्येय

**गोंदिया :-** जिल्हा परिषदेच्या सभागृहात जिल्हा परिषद विकास आराखडा आणि पंचायत समिती विकास आराखडा निर्माण करण्याच्या अनुषंगाने प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

१६ वा वित्त आयोगांतर्गत ९ संकल्पनावर आधारित सर्वसमावेशक आराखडा तय्यार करण्याचे ध्येय या प्रशिक्षणातून गाठन्यात आले आहेत.या प्रशिक्षणात जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर, उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांच्यासह सर्व सदस्य उपस्थित होते. या आराखड्यासाठीचे प्रशिक्षण उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पंचायत ) एम. एम. वासनिक, आणि सेवानिवृत्त गटविकास अधिकारी एन. आर.जमईवार यांनी दिले.प्रशिक्षणा दरम्यान प्रवीण



प्रशिक्षकांनी सांगितले की,जिल्हा परिषद विकास आराखडा आणि पंचायत समिती विकास आराखडा हा पंचायती राज व्यवस्थेतील विकेंद्रीत नियोजनाचा अविभाज्य घटक असतो.तो ग्रामपंचायत विकास आराखड्याला पूरक ठरतो.हे आराखडे पंचायती राज संस्थांच्या तिन्ही स्तरावरील विकास कामांचे अभिसरण, सम न्वयन आणि श्रेणीबद्ध पद्धतीने पूर्ण केले जातात. या माध्यमातून केंद्र, राज्य आणि पंचायतीच्या क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे योजनांचे एकत्रीकरण केलं जातं. भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद २४३ (जी) अन्वये पंचायत राज व्यवस्थेत आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय निर्माण करण्यासाठी या आराखड्यांचे अतुलनीय महत्व आहे.याशिवाय स्थानिक प्रशासन म्हणून स्थानिक नागरिकांना मूलभूत सेवा पुरविणे आणि त्यांच्या भागातील गरीब व उपेक्षित घटकांच्या सुरक्षिततेकडे लक्ष देण्याची जबाबदारी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची आहे. उपलब्ध संसाधनाचा कार्यक्षम आणि जबाबदारीने वापर करून सर्वसमावेशक आराखड्याच्या अंमलबजावणी द्वारे हे साध्य केले जाऊ शकते.

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीचा निधी ग्रामपंचायत, तालुका पंचायत, आणि जिल्हा परिषदेच्या तिन्ही स्तरांमध्ये वाटप केले जाणार असून त्रिस्त्रीय व्यवस्थेमध्ये अनुक्रमे ८०% १०% आणि १०% असे संकेतात्मक प्रम ाण सुचविण्यात आले आहेत. या अनुदान संरचनेत निधीचे मूलभूत अनुदान ८०% आणि कामगिरी आधारित अनुदान २० टक्के असे दोन भाग करण्यात आले आहेत. १६ व्या वित्त आयोगाची विशेष बाब म्हणजे स्व-उत्पन्न वाढविणे, पारदर्शकता आणि सर्वांची योजना सर्वांचा विकास या अटी निश्चित करण्यात आल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून पंचायतीनी आपल्या नागरिकांना मूलभूत सेवा पुरविल्या पाहिजेत.तसेच गरीब वंचित घटकांशी संबंधित प्रश्न सोडविण्यात महत्त्वपूर्ण आणि जबाबदार भूमिका बजाविली पाहिजे.ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्यासाठी उपलब्ध संसाधनाच्या योग्यरीत्या वापर करून लोक सहभागावर आधारित सर्व समावेशक आणि एकात्मिक स्थानिक विकास आराखडा तयार करुण त्यांची अंमलबजावणी करावी. असे प्रशिक्षण यावेळी देण्यात आले.

# नगरपरिषदेची कार्यालये इंदिरा गांधी स्टेडियममध्ये होणार स्थलांतरित

**गोंदिया:** - गोंदिया नगर परिषदेच्या जीर्ण इमारतीत अधिकारी व कर्मचारी कर्तव्य बजावत असून शुक्रवार ३ जुर्ले रोजी उपमुख्य अधिकारी श्रीमती झलके यांच्या कक्षातील भिंत कोसळल्याची घटना घडली.गेल्यावर्षी सुध्दा काही कार्यालयाचे छत कोसळल्याची घटना घडलेली होती.या पार्श्वभूम ीवर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी बोरकर यांनी जीर्ण इमारतीमुळे कोणत्याही अप्रिय घटना घडू नये म्हणून न.प.च्या सर्व विभागाच्या कार्यालयांना इंदिरा गांधी स्टेडियम येथे तात्पुरत्या स्वरुपात हलविण्याचे आदेश जारी केले आहे.

जिल्ह्यातील गोंदिया शहरा-तही मागील चार दिवसांपासून मुसळधार पावसालासा सुरुवात झाली आहे.सततच्या मुसळधार पावसामुळे गोंदिया नगरपरिषदेची




मुख्य प्रशासकीय इमारत अत्यंत जीर्ण आणि धोकादायक स्थितीत पोहोचली आहे. या पार्श्वभूमीवर,कोणत्याही प्रकारची जीवितहानी टाळण्यासाठी आणि सुरक्षिततेचा उपाय म्हणून नगरपरिषदेची सर्व विभागांची कार्यालये तातडीने इंदिरा गांधी स्टेडियम येथे तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या संदर्भात नगरपरिषद गोंदियाचे मुख्याधिकारी यांनी ३ जुलै २०२६ रोजी आदेश जारी केला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे नगरपरिषदेच्या ऐतिहासिक व जुन्या इमारतीची दुरवस्था झाली आहे.

या इमारतीमध्ये काम करणारे अधिकारी, कर्मचारी तसेच विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांच्या जीविताला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली होती. हीच बाब लक्षात घेऊन मुख्याधिकाऱ्यांनी सर्व विभागांचे कार्यालय तात्काळ प्रभावाने इंदिरा गांधी स्टेडियममधील उपलब्ध जागेत हलवण्याचे आदेश दिले आहेत.

साप्ताहिक
# बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि. ०८ जुलै २०२६


## संपादकीय

### आषाढी वारी वारकऱ्यांची "चरण सेवा"

आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे "चरण सेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरण सेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. वारकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या "चरण सेवा' उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील. आषाढी वारीदरम्यान दररोज अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तत्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत. या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार पालखी मार्गावर रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

चरण सेवेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे. गतवर्षी राबविण्यात आलेल्या "चरण सेवा' उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उपक्रमाद्वारे सुमारे १ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला होता. यंदाही अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत चरण सेवा, वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य जनजागृती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

"भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याचीफ या संकल्पनेवर आधारित ङ्गचरण सेवा' हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देणारा अभिनव उपक्रम आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकारातून जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा पायी प्रवास अधिक सुरक्षित, सुदृढ आणि सुखकर होण्यास मोठी मदत होणार आहे. संत तुकाराम महाराजांनी ङ्गतुज मागणें तें देवा, आम्हां तुझी चरण सेवाफ या अभंगातून चरण सेवेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्याच सेवाभावातून प्रेरणा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मचरण सेवाफ उपक्रम गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे. यंदा या उपक्रमाचे दुसरे वर्षे आहे. आषाढी वारीत अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायावर मोठा ताण येत असल्याने त्यांना औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, आधुनिक मसाज उपकरणांच्या साहाय्याने स्नायूंना आराम, सूज, वेदना व फोडांवर प्राथमिक उपचार तसेच आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देत सेवाभावातून आधार देणारी हीच मचरण सेवाफ होय. संत तुकाराम महाराजांच्या सेवाभावाच्या विचारांना आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देत वारकरी परंपरा आणि लोकसेवेचा सुंदर संगम या उपक्रमातून घडविण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि सेवाभावी दृष्टिकोनातून "चरण सेवा' उपक्रम साकार झाला आहे. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देणारा हा एक अभिनव उपक्रम असून, आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देतानाच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न या माध्यमातून होत आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष विविध संस्थांच्या समन्वयातून यंदाही ही चरण सेवा अधिक व्यापक स्वरूपात वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास सज्ज झाली आहे.

## "दलाई लामा हे दया, प्रेम व मानवतेचे प्रतीक" : अतिरिक्त जिल्हाधिकारी अभिजित घोरपडे

**गोंदिया :-** "परम पूज्य दलाई लामा हे दया, प्रेम आणि मानवतेचे जिवंत प्रतीक असून त्यांचे विचार संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आहेत," असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी अभिजित घोरपडे यांनी केले. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील गोठणगाव येथील नोर्गेलिंग तिबेटी वस्ती येथे दलाई लामा यांची ९१ व्या वाढदिवसनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संभोटा तिबेटी शाळेच्या मैदानावर हा सोहळा अत्यंत सकारात्मक व भावनिक वातावरणात पार पडला.

यावेळी उपविभागीय दंडाधिकारी ज्योती कांबळे, तहसीलदार अनिरुद्ध कांबळे, केशोरी पोलीस ठाण्याचे स्टेशन हेड ऑफिसर चेतन देखाणे हे मान्यवर उपस्थित होते. तसेच नागपूर व भंडारा येथील ङ्गतिबेट सपोर्ट ग्रुप - इंडो तिबेटी मैत्री सोसायटीफ्चे सुमारे ३५ सदस्य आणि स्थानिक तिबेटी समाज सहभागी होते.

यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. घोरपडे यांनी तिबेटी समाजाला संबोधित करताना, ङ्गही भूमी तुमचे घर आहे. तिबेटी समाजाचा संघर्ष सोपा नाही, मात्र प्रशासन तुमच्या पाठीशी ठामपणे उभे आहे,ङ्ख असे सांगितले. तसेच कॅनॉल रोड दुरुस्ती व तिबेटी वस्तीच्या जमीन लीज संदर्भात आवश्यक पावले उचलल्याची माहिती त्यांनी दिली. भविष्यात कोणतीही अडचण असल्यास प्रशासनाशी संपर्क साधण्याचेही त्यांनी आवाहन केले.

सकाळी दलाई लामांच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व प्रार्थनेने सुरुवात करण्यात आली. सेटलमेंट ऑफिसर तेनझिन त्सांगपा यांनी धर्मशाळा येथील केंद्रीय तिबेटी प्रशासनाचे ङ्गकाशाग निवेदनफ वाचून दाखवले. स्थानिक तिबेटी सभेचे अध्यक्ष लोबसांग धोन्यो यांनी तिबेटी संसदेच्या अध्यक्षांचे निवेदन सादर केले.प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर सेटलमेंट ऑफिसर यांनी मान्यवरांचे स्वागतपर भाषण प्रथमतः मराठीत सादर केले. मान्यवरांच्या हस्ते माजी तिबेटी स्थानिक सभासद व कॅम्प लीडर्स यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. स्थानिक तिबेटी नागरिकांनी सादर केलेल्या पारंपरिक सांस्कृतिक नृत्यांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# गावभेटीचे वेळापत्रक दर्शनी भागावर दिसेना!

## तलाठी कार्यालयाकडून शासकीय आदेशाची पायमल्ली; पारदर्शक कामकाजावर प्रश्नचिन्ह

**तिरोडा :-** महसूल प्रशासन अधिक पारदर्शक, लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने प्रत्येक तलाठ्याने आपल्या कार्यक्षेत्रातील गावभेटीचे वेळापत्रक संबंधित तलाठी कार्यालयाच्या दर्शनी भागावर प्रदर्शित करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, तालुक्यात या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे नागरिक आणि शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

गोंदिया जिल्ह्यात अनेक ठिकाणी तलाठ्यांची पदे रिक्त असल्याने उपलब्ध तलाठ्यांवर दोन ते तीन गावांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. विशेषतः पावसाळ्याच्या काळात नैसर्गिक आपत्ती, पंचनामे, पीक नुकसानाची पाहणी, विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी तसेच महसुली कामांचा वाढलेला ताण यामुळे तलाठी सतत दौऱ्यावर असतात. अशा परिस्थितीत संबंधित तलाठी नेमक्या कोणत्या दिवशी आणि कोणत्या गावात उपलब्ध असतील, याची माहिती नागरिकांना मिळणे अत्यंत आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर महसूल विभागाने प्रत्येक तलाठ्याने आठवड्याचे गावनिहाय दौरा वेळापत्रक कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावावे, जेणेकरून नागरिकांना विनाकारण हेलपाटे मारावे लागू नयेत, असे निर्देश दिले आहेत. परंतु, तिरोडा तालुक्यात अनेक तलाठी कार्यालयांमध्ये असे वेळापत्रक प्रदर्शित केले जात नसल्याची नागरिकांची तक्रार




आहे. त्यामुळे तलाठी कार्यालयात गेल्यानंतर संबंधित अधिकारी दुसऱ्या गावात असल्याचे सांगितले जाते आणि नागरिकांना आल्यापावली परतावे लागते.

सध्या पावसाळ्याचा हंगाम सुरू असून शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी, सात-बारा उतारा, फेरफार, वारस नोंद ई-पीक पाहणी, विविध शासकीय योजनांचे प्रस्ताव तसेच इतर महसुली कामांसाठी तलाठी कार्यालयात वारंवार जावे लागत आहे. मात्र, तलाठी नेमके कुठे आहेत, याची पूर्वकल्पना नसल्याने शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

महसूल विभागाने दिलेल्या आदेशानुसार कार्यालयाच्या दर्शनी भागावर वेळापत्रक लावल्यास नागरिकांना कोणत्या दिवशी संबंधित गावात तलाठी उपलब्ध असतील, याची स्पष्ट माहिती मिळू शकते. त्यामुळे अनावश्यक गर्दी, हेलपाटे आणि गैरसोय टाळता येणे शक्य आहे. परंतु या आदेशाची अंमलबजावणी अनेक ठिकाणी होत नसल्याने शासनाच्या पारदर्शक प्रशासनाच्या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे दिसून येते.

**वेळापत्रक नसल्याने शेतकरी त्रस्त**


तालुक्यात अनेक तलाठी कार्यालयांमध्ये गावभेटीचे वेळापत्रक दर्शनी भागावर लावले जात नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे सात-बारा, फेरफार, वारस नोंद, पीक कर्ज, पंचनामा आणि शासकीय योजनांसाठी आलेल्या शेतकऱ्यांना तलाठी उपलब्ध नसल्याने वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. त्यामुळे त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात आहे.

**शासनाचे निर्देश काय ?**

महसूल व वनविभागाच्या निर्देशानुसार प्रत्येक तलाठ्याने आठवड्याचे गावनिहाय दौरा वेळापत्रक संबंधित तलाठी कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावणे बंधनकारक आहे. कोणत्या दिवशी कोणत्या गावात तलाठी उपस्थित राहणार, याची माहिती नागरिकांना आगाऊ मिळावी, अनावश्यक हेलपाटे टळावेत आणि महसूल प्रशासनात पारदर्शकता यावी, हा या आदेशामागील व उद्देश आहे. वेळापत्रकात कोणत्या दिवशी कोणत्या गावात उपस्थिती राहणार, याची स्पष्ट नोंद असणे आवश्यक आहे.

# गोरेगावची सुरक्षा व्यवस्था वाऱ्यावर

**गोंदिया:-** जिल्ह्यातील महत्त्वाचे तालुक्याचे ठिकाण असलेल्या गोरेगाव शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. शहराच्या सुरक्षेसाठी लाखो रुपये खर्चुन बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे अनेक दिवसांपासून बंद आहेत. या स्थितीचा फायदा घेत काही छपरी टोळ्या आणि भाईगिरी करणार्या तरुणांचा वावर वाढला आहे.



शहरातील प्रमुख चौक, संवेदनशील ठिकाणे आणि महत्त्वाच्या मार्गावर नजर ठेवण्यासाठी नगरपंचायतीच्या माध्यमातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. त्यानंतर ही यंत्रणा पोलिस प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आली. मात्र, नियमित देखभाल आणि दुरुस्तीच्या अभावामुळे सध्या सर्व कॅमेरे बंद पडले असून गुन्हेगारांवर असलेला तांत्रिक वचक संपुष्टात आला आहे.

शनिवारी रात्री दोन तरुणांनी भररस्त्यात एका कारचालकाला शिवीगाळ केल्याची घटना घडली. यापूर्वीही विविध चौकांमध्ये टोळक्यांनी एकत्र येऊन वाद घालणे, निर्माण करणे आणि नागरिकांना त्रास देण्याच्या घटना वारंवार घडल्या आहेत. पवन तलाव परिसरात सायंकाळनंतर काही जोडपी आणि छपरी टोळ्यांची गर्दी वाढत असते. पोलिसांचा प्रभाव कमी झाल्यामुळेच अशा प्रवृत्तींचे धाडस वाढत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

नवीन ठाणेदारांकडून अपेक्षा

गोरेगाव पोलिस ठाण्यात नुकत्याच पोलिस निरीक्षक वैशाली ढाले यांनी पदभार स्वीकारला आहे. पूर्वीच्या काळात बिघडलेली कायदा-सुव्यवस्थेची घडी पुन्हा सुरळीत करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. शहरातील छपरी टोळ्यांवर कारवाई करणे, रात्रीची गस्त वाढविणे तसेच बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने सुरू करण्यासाठी आवश्यक पावले उचलावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## विस्मरणात गेलेले आदिवासी लोकनेते-क्रांतिवीर नारायणसिंह उइके

पूर्व विदर्भातील जबरान जोत चळवळीचे प्रणेते, आदिवासी व भूमीहीनांना जमिनी मिळवून देणारे, गोंदिया तालुका मुख्यालयाचे पूर्वीचे नाव गोंडिया असेच असायला पाहिजे अशी मागणी लावून धरणारे, आदिवासी, भूमीहीन लोकांना जमिनीचे पट्टे मिळावे म्हणून ६० हजार लोकांचा मोर्चा नागपूर विधानसभेवर घेऊन जाणारे उच्चशिक्षित, सुजाण, निर्भीड व त्यागी आदिवासी लोकनेते क्रांतिवीर नारायणसिंह उइके हे मूळचे गोंदिया जिल्ह्यातील कटंगी (नागरा) या गावचे. त्यांचा जन्म गोंदिया जिल्ह्यातील (पूर्वीच्या भंडारा जिल्ह्यात) १९१७ साली कटंगी या गावी झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. १९२५ मध्ये त्यांनी तत्कालीन नागपूर विद्यापीठातून बी. ए. ची पदवी प्राप्त केली. त्या काळात आदिवासी समाजातील अगदीच मोजके व्यक्ती पदवी परीक्षेपर्यंत पोहचलेले होते. अभ्यासातच हुशार नाही तर ते उत्तम फुटबॉल व कबड्डीपटू होते. काही काळ त्यांनी चंद्रपूर (चांदा) येथे न्यू इंग्लिश हायस्कूल या शाळेत शिक्षक पदावर कार्य केले. १९४७ मध्ये या नोकरीचा त्याग करून ते आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी सोय व्हावी यासाठी वस्तीगृहाची स्थापना केली. चांदा जिल्हा काँग्रेस आदिवासी सेवा मंडळाची स्थापना करून आदिवासींच्या प्रश्नांना वाचा फोडली.

१९५२ मध्ये पुराडा (हेटी) निर्वाचन क्षेत्रातून ( सध्या कुरखेडा तालुक्यातील गाव) संपूर्ण देशात काँग्रेसची लाट असतांनाही ते अपक्ष उमेदवार म्हणून विधानसभेवर निवडून गेले. १९५५ मध्ये त्यांनी नागविदर्भ आदिवासी सेवा मंडळाची स्थापना केली. १९५५-५८ ते या संस्थेचे अध्यक्ष होते.

१९५५-५८ या काळात वडसा- भंडारा या क्षेत्रात त्यांनी जबरानजोत आंदोलन चालवले. ज्यातून भूमिहीनांना जमिनीचा हक्क मिळण्यात मदत झाली. १९५४ च्या भंडारा येथील पोटनिवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांनी सर्वतोपरी मदत केली. आदिवासी व दलित जनसंख्या एकत्रित यावी हा त्यांचा उद्देश होता.

६ डिसेंबर १९६० रोजी पूर्व विदर्भातून बैलबंडी, खाचर व पायी चालून अंदाजे ६०, ००० लोकांचा मोर्चा नागपूर विधानसभेवर काढला होता. १८ एप्रिल १९६५ रोजी आमरण उपोषण करुन भूमीहीन



आदिवासींना जमिनीचे पट्टे मिळवून दिले.

१८८१ च्या इंपेरिअल गॅजेटिअर ऑफ इंडिया नुसार भंडारा जिल्ह्यात भंडारा व्यतिरिक्त तिरोडा व साकोली असे दोनच तालुके होते. १९१४ मध्ये तिरोडा हे तालुक्याचे मुख्यालय गोंदिया येथे हलविण्यात आले. १९०८ च्या सेंट्रल प्रोव्हिन्स डिस्ट्रिक्ट गॅजेटिअर भंडारा मध्ये आर. व्ही. रसेल या इंग्रज आयसीएस अधिकाऱ्याने केलेल्या नोंदीनुसार गोंदिया परिसर हा गोंड राजाच्या अधिपत्याखाली होता तेव्हा येथे विस्तीर्ण जंगल होते. गोंड जातीचे लोकं येथील मूळ रहिवासी होते. त्यांचा उद्योग गोंद( डिंक) आणि लाख विकण्याचा होता. त्यावेळी लाखेचे ३२ कारखाने गोंदिया परिसरात होते. गोंड जातीच्या लोकांच्या वास्तव्यावरुन या शहराला गोंडिया हे नाव पडले होते. परंतु, १९१४ नंतर परप्रांतीय वसाहत उभी राहिली व मूळ निवासी आदिवासी हळूहळू डोंगराळ भागात जाऊन राहू लागले. इंग्रजी स्पेलिंग गोंडिया असलेले हे शहर नंतर हिंदी व मराठीत गोंदिया असे प्रचलित झाले. क्रांतिवीर नारायण सिंह उईके यांनी या शहराचे नाव मगोंडियाफ असेच असायला पाहिजे अशी मागणी करुन ब्रम्हपुरी येथे आमरण उपोषण केले.

या उपोषणा दरम्यानच त्यांनी २६ जुलै १९७३ रोजी आपले प्राण सोडले. त्यांचा एकमेव पुतळा ब्रम्हपुरी ( जिल्हा चंद्रपूर) येथे ब्रम्हपुरी वडसा रोडवर आहे. त्याला नारायण सिंह उईके चौक असे नाव दिले गेले. आदिवासींच्या हक्कांसाठी लढणारे हे गोंदिया जिल्ह्यातील लढवय्ये लोकनेते आज विस्मरणात गेल्याचे जाणवते.

पूर्व विदर्भातील आदिवासी व गैरआदिवासी समाजासाठी त्यांचा हा इतिहास महत्वपूर्ण आहे

**- डॉ. रुपेशकुमार राऊत**

(जयंती विशेष लेख - ११ जुलै)

श(११ जुलै २०२६)

# अपघात ग्रस्त शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदानाचे कवच

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेचा ७०३ कुटुंबांना लाभ

**गोंदिय:-** नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास अशा शेतकऱ्यांच्या कुटुंबावर उडवलेल्या संकटाच्या काळात त्यांना आधार मिळावा यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान या भीमा सुरक्षा योजनेचे कवच मिळत आहे. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना दोन लक्ष रुपयाचे सानुग्रह अनुदान दिले जाते. शेतकऱ्यांचा मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास अशा शेतकऱ्यांसाठी राबविण्यात आलेल्या या योजनेमुळे नागपूर विभागात ७०३ कुटुंबांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आला आहे.

शेती हा निसर्गावर अवलंब असलेला व्यवसाय आहे शेतात काम करताना अनेकदा अनपेक्षित अपघात घडतात आणि कुटुंबाचा आधार असलेली व्यक्ती संकटात सापडते अशावेळी कुटुंबाची आर्थिक ओढाताण होऊ नये यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राज्यात लागू केली ही योजना अत्यंत महत्त्वाची ठरत आहे.


राज्यातील लाखो शेतकऱ्यांना या योजनेमुळे विम्याचे संरक्षण मिळाले आहे. शेतकऱ्यांना ही योजना अत्यंत लाभदायी ठरत आहे.

शेती कामात होणाऱ्या अपघात सर्पदंश, वीज पडणे किंवा वाहन अपघातासारख्या घटनांमुळे शेतकरी कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळतो अशा संकट काळात संबंधित कुटुंबांना सावरण्यासाठी कृषी विभागामार्फत ही सानुग्रह अनुदान योजना राबवली जात आहे विशेष म्हणजे ही योजना कायमस्वरूपी असून यासाठी शेतकरी किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही एका सदस्याचे नाव सातबारावर असते आवश्यक आहे. या वर्षापासून शासनाने या योजनेत शेतमजुरांचाही समावेश करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेमध्ये या वर्षात नागपूर विभागात प्राप्त झालेल्या प्रस्तावापैकी ६०३ प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत तर २७१ प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहेत यापैकी ५६१ मृत्यू संदर्भात तर आठ अपंगत्व आलेल्या अशा एकूण ५६९ प्रकरणामध्ये अकरा कोटी ३४ लक्ष रुपयाचे सानुग्रह अनुदान वितरित करण्यात आले आहेत.

या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अपघाती मृत्यू, अपघातामुळे डोळे निकामी होणे तसेच अवयव निकामी होणे यासाठी दोन लक्ष रुपयाची नुकसान भरपाई देण्यात येते यासाठी शेतकरी कुटुंबांना सातबाराचा उतारा मृत्यूचा दाखला तसेच शेतकऱ्यांचे वारसदार म्हणून नोंद असणे आवश्यक आहे तसेच वारसदाराची ओळखपत्र वयाचा दाखला त्यासोबत घटनास्थळाचा पंचनामा व प्रथम माहिती अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

या योजनेच्या पात्रता निकषानुसार शेतकऱ्याच्या कुटुंबातील वहीतीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले आई-वडील यापैकी एक सदस्य शेतकऱ्याची पती अथापत्नी मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती




असे १० ते ७५ वयोगटातील एकूण दोन जणांना अपघाती विमा संरक्षण यामध्ये एक शेतकरी आणि एक शेतकऱ्याच्या कुटुंबातील व्यक्ती यांना अनुज्ञेय आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या अपघातामध्ये रस्ते अथवा रेल्वे अपघात, जंतुनाशके हाताळताना अथवा अन्यकारणाने विषबाधा वीज पडून मृत्यू, उंचावरून पडून झालेला अपघात, नक्षलवाद्याकडून झालेल्या हत्या, बाळांतपणातील मृत्यू, पाण्यात बुडून झालेला मृत्यू, विजेचा धक्का बसल्याने झालेला मृत्यू, खून, सर्पदंश, विंचू दंश, जनावरांच्या चावल्यामुळे झालेला मृत्यू, दंगल आदी घटनांमध्ये शेतकऱ्याचा झालेला मृत्यू, अपंगत्व आदींचा समावेश करण्यात आला आहे. शेतकरी कुटुंबावर ओढवलेल्या आपत्तीचा सामना करण्यासाठी ही योजना सहाय्यभूत ठरत आहे.

**अनिल गडेकर**

# मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचा कार्यक्रम-२०२६

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १४ मे २०२६ रोजीच्या पत्राद्वारे मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण (डशिलळरश्र खपींशपीळींश ठर्शींळीळेप) कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार महाराष्ट्र राज्यासह गोंदिया जिल्ह्यातही ही प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता व अचूकता सुनिश्चित करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे.

या पुनरिक्षणासाठी अर्हता दिनांक ०१ ऑक्टोबर २०२६ निश्चित करण्यात आला आहे. कार्यक्रमाची अंमलबजावणी विविध टप्प्यांमध्ये करण्यात येणार आहे. त्यानुसार २० जून ते २९ जून २०२६ या कालावधीत तयारी, प्रशिक्षण व छपाईची कामे पूर्ण करण्यात येतील. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ दरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इङज) यांच्या मार्फत घरोघरी भेटी देऊन मतदारांची माहिती पडताळणी केली जाईल.

मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण २९ जुलै २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येईल. प्रारूप मतदार याद्या ०५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येतील. त्यानंतर ०५ ऑगस्ट ते ०४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती दाखल करण्याची संधी नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येईल. पुढे ०५ ऑगस्ट ते ०३ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्राप्त दावे व हरकतींचा निपटारा करण्यात येईल. अंतिम मतदार याद्या ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येतील.

या प्रक्रियेदरम्यान नागरिकांना https://voters.eci.gov.in या संकेतस्थळावर जाऊन स्वतःचे तसेच आपल्या कुटुंबीयांचे नाव



मतदार यादीत तपासण्याची सुविधा उपलब्ध आहे. आवश्यक असल्यास संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून मदतही मिळू शकते.

जर मतदाराचा तपशील उपलब्ध नसेल किंवा डेटाबेसशी जुळत नसेल, तर संबंधित मतदारास नोटीस देण्यात येईल. अशावेळी मतदारांनी आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. जन्मतारीख व जन्मस्थळ सिद्ध करण्यासाठी विविध कालावधीप्रमाणे कागदपत्रांची अट निश्चित करण्यात आली आहे.

०१ जुलै १९८७ पूर्वी जन्म झालेल्या व्यक्तींना स्वतःची ओळख सिद्ध करणारे एक कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. ०१ जुलै १९८७ ते ०२ डिसेंबर २००४ दरम्यान जन्म झालेल्या व्यक्तींना स्वतःबरोबरच पालकांचेही कागदपत्र सादर करावे लागेल. तर ०२ डिसेंबर २००४ नंतर जन्म झालेल्या व्यक्तींना स्वतः, वडील व आई यांचे कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. यामध्ये जन्म प्रमाणपत्र, पारपत्र, शैक्षणिक प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, शासकीय ओळखपत्र, जमीन वाटप प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांचा समावेश आहे. आवश्यकतेनुसार परदेशात जन्म झाल्यास संबंधित दूतावासाचे प्रमाणपत्र किंवा नागरिकत्व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**जिल्हाधिकारी मंदार पत्की यांचे आवाहन**

जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा. प्रत्येक पात्र नागरिकाने आपले नाव मतदार यादीत आहे याची खात्री करून घ्यावी तसेच आवश्यक त्या दुरुस्त्या व बदल वेळेत करावेत. या प्रक्रियेमुळे निवडणूक प्रणाली अधिक पारदर्शक, विश्वासार्ह व अचूक होण्यास मदत होईल. तसेच नागरिकांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इङज) यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असेही त्यांनी नमूद केले आहे. सर्वांनी वेळेवर आपली कागदपत्रे सादर करून या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक असून नागरिकांनीही जागरूक राहून आपली नावे मतदार यादीत अचूकरीत्या नोंदविण्यास सहकार्य करावे, हीच अपेक्षा आहे.

**-जिल्हा माहिती कार्यालय, गोंदिया**

# निमगाव आंबेनाला प्रकल्पाचे काम त्वरित सुरू करण्याकरिता पर्यायी जागा उपलब्ध करून द्या

**तिरोडा :-** तालुक्यातील निमगाव लघु पाटबंधारे प्रकल्पाचे बांधकाम रोहयो अंतर्गत सन १९७३ ते १९८४ पर्यंत करण्यात आले. परंतु वनसंरक्षण अधिनियम १९८० लागू झाल्यानंतर प्रकल्पाचे काम बंद करण्यात आले. या प्रकल्पाचे काम सुरू करण्याकरिता पर्यायी जागा त्वरित उपलब्ध करून देण्यात यावी. अन्यथा उपोषणाला बसण्याची परवानगी द्यावी अशी मागणी आ. विजय रहांगडाले यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे केली आहे.



## १५ दिवसात कामासाठी जागा उपलब्ध करून देणार

**या प्रकल्पाचे काम त्वरित सुरू करण्यात यावे. अथवा मला आमरण उपोषणावर बसण्याची परवानगी देण्यात यावी, अशी मागणी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे आ. विजय रहांगडाले यांनी केली. यावर वनमंत्र्यांनी येत्या १५ दिवसात पर्यायी वन वळतीकरणाकरिता जागा उपलब्ध करून देण्याचे आदेश विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहे.**

निमगाव आंबेनाला प्रकल्पाचे काम सुरू करण्याकरिता १४१.६२ हे. (सुधारित १३५.१५ हे. आर) वन जमीन वळतीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला. केंद्र शासनाचे पत्र २४/०८/२००६ अन्वये तत्त्वतः मान्यता प्रदान करण्यात आली. सन २०१२-१३ मध्ये सदर क्षेत्र नवेगाव नागझिरा व्याघ्र क्षेत्र घोषित झाल्यामुळे सन २०१७ मध्य राष्टीय वन्यजीव महामंडळाची मंजुरी घेण्यात आली. त्यानंतर सर्व निधीचा भरणा करून अंतिम वन मान्यतेचा प्रस्ताव केंद्र शासनास सन २०२३ मध्ये सादर करण्यात आला. परंतु केंद्र शासनाने त्यांचे १७/०५/२०२४ व तदनंतर १/१०/२०२४ अन्वये काही त्रुटी काढल्या.

या प्रकल्पामुळे मतदारसंघातील ४ दलघमी पाणीसाठा निर्माण होऊन १,००० हे. आर क्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ देता येऊ शकतो. अशा महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम वारंवार पाठपुरावा करूनही तसेच पैस भरूनही वन वळती करण्याकरिता जागा मिळत नसल्यामळे सरू झालेले नाही.

# आर्थिक वर्षातील जिल्हा वार्षिक योजनेचे प्रस्ताव तांत्रिक मान्यता मिळवून सादर करावे

## जिल्हाधिकारी मंदार पत्की यांचे यंत्रणांना निर्देश, जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा

**गोंदिया:-** वर्ष २०२६-२०२७ या आर्थिक वर्षातील जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, आदिवासी उपयोजना क्षेत्रबाह्य साठीचे प्रस्ताव संबंधित विभागांनी त्यांच्या विभागाकडून तांत्रिक मान्यता मिळवून लवकरात लवकर प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना आज जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी जिल्हा वार्षिक योजनेच्या आढावा बैठकीत दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आज जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अनुषंगाने सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना व आदिवासी उपयोजना क्षेत्रबाह्य अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ चंद्र दोंतुला, भारतीय वनसेवेचे अधिकारी प्रितमसिंग कोडापे, प्रभारी जिल्हा नियोजन अधिकारी रुपेशकुमार राऊत व सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री पत्की म्हणाले, वर्ष २०२६-२७ करीता जिल्हा वार्षिक योजनेची वित्तीय तरतुद ३२४ कोटी आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील नागरिकांसाठी उपयुक्त लोकोपयोगी विविध कामे केली जातील, त्यासाठी संबंधित यंत्रणांनी त्यांच्या विभागाकडून तातडीने तांत्रिक मान्यता मिळवून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करून कामाला सुरुवात करावी असे सांगितले. वर्ष २०२५-२६ या आर्थिक वर्षात मंजूर कामाच्या स्थितीबद्दल यावेळी चर्चा करण्यात आली तसेच २०२५-२६ या आर्थिक वर्षात मंजूर कामावरील दायित्व निधीची मागणी परिपूर्ण प्रस्तावासह सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. अपूर्ण असलेली कामे प्राथमिकतेने पूर्ण करून यासंदर्भातला अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावा अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

या वर्षापासून जिल्हा परिषद तसेच राज्य शासनाच्या सर्व यंत्रणांच्या कोणत्याही कामांना मुदतवाढ देता येणार नाही. त्यामुळे या आर्थिक वर्षातील कामे या आर्थिक वर्षातच पूर्ण गांभीर्याने करावी याची दक्षता कार्यालय प्रमुखांनी घ्यावी असेही स्पष्ट सूचना देण्यात आल्या. जिल्हा विकास आराखडा महास्ट्राइड (Maha STRIDE) अंतर्गत वर्ष २०२६-२७ च्या वार्षिक कृती आराखड्यात केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा समावेश गोंदिया जिल्ह्याच्या सर्वांगीण आणि सर्वंकष विकासासाठी करण्याकरिता विभागांनी नाविन्यपूर्ण संकल्पना सुचविणे अपेक्षित असून त्या लवकर सांगितल्यास त्याप्रमाणे आखणी करता येईल असेही जिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले.

बैठकीचे संचालन प्रभारी जिल्हा नियोजन अधिकारी रुपेश-कुमार राऊत यांनी केले.

# शाळेत वर्गखोल्यांची वानवा, तुटके-फुटके बाके अन् अपूर्ण शिक्षकसंख्या

## भौतिक सुविधांसाठी ग्रामपंचायतकडे शालेय व्यवस्थापन समितीचे निवेदन

**चिचगड :-** जिल्हा परिषद केंद्रीय वरिष्ठ प्राथमिक शाळा, चिचगड येथे वर्गखोल्यांची कम तरता, तुटके-फुटके डेस्क-बेंच, अपूर्ण शिक्षकसंख्या आणि अन्य मूलभूत सुविधांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याची बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भूपेंद्र मस्के यांनी ग्रामपंचायतीकडे आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले आहे.



सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात शाळेत २४३ विद्यार्थी, ६ शिक्षक आणि ४ इमारती आहेत. मात्र, वाढत्या विद्यार्थीसंख्येच्या तुलनेत उपलब्ध वर्गखोल्या व सुविधा अपुऱ्या पडत आ-हेत. अनेक डेस्क-बेंच जीर्ण झाल्याने विद्यार्थ्यांना बसण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत असून, प्रार्थनेसाठी स्वतंत्र शेड नसल्याने उन्हाळा व पावसाळ्यात गैरसोय होत आहे. तसेच सोलर प्रणाली, सीसीटीव्ही आणि विद्युत यंत्रणेच्या दुरुस्तीचीही आवश्यकता आहे.

निवेदनात १०० डेस्क-बेंच, प्रार्थना शेड, सोलर दुरुस्ती, सीसीटीव्ही व विद्युत दुरुस्ती, ७ व्हाईट बोर्ड तसेच वार्षिक विद्युत भरण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. यापैकी डेस्क-बेंच, प्रार्थना शेड आणि विद्युत भरणा ही कामे अत्यंत तातडीची असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनाच्या प्रती आमदार संजय पुराम, मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प. गोंदिया), शिक्षणाधिकारी (प्राथमिक), गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी आणि केंद्रप्रमुख यांनाही माहितीस्तव पाठविण्यात आल्या आहेत.

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासह रिक्त शिक्षकपदे तातडीने भरावीत, अशी मागणी शालेय व्यवस्थापन समिती, पालक आणि ग्रामस्थांनी केली आहे.

## विशेष लोक अदालतीचे आयोजन १८ जुलै व २१ नोव्हेंबरला

**गोंदिया :-** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील उच्च न्यायालय (सर्व खंडपीठासह), सर्व जिल्हा व तालुका न्यायालये येथे निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्टस ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत प्रलंबित प्रकरणे तसेच दाखलपूर्व वाद प्रकरणे सामंजस्याने मिटविण्याकरीता ङ्गविशेष लोक अदालतीचेफ आयोजन दि.१८ जुलै व २१ नोव्हेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे.

न्यायालयात प्रलंबित अस-लेली निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्टस ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गतची प्रकरणे विशेष लोक अदालतीमध्ये समझोत्याने निपटारा करण्याकरीता आपली प्रकरणे ज्या न्यायालयात प्रलंबित असतील त्या न्यायालयात अर्ज करावा. तसेच दाखलपूर्व प्रकरणांबाबत नजीकच्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा तालुका विधी सेवा समिती यांच्याकडे अर्ज करावा आणि विशेष लोक अदालतीमध्ये आपल्या प्रकरणांचा सामंजस्याने व तडजोडीने निपटारा करावा. गोंदिया जिल्ह्यासाठी ८५९१९०३९३५ या क्रमांकावरही संपर्क करुन माहिती मिळवू शकता. असे सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया यांनी कळविले आहे.

# दोन वाघांच्या कातडीसह पोलीस कर्मचारी व सहकाऱ्याला अटक

**गडचिरोली :-** तब्बल दोन वाघांच्या कातडीची तस्करी करताना अहेरीतील एका पो-लीस कर्मचाऱ्यासह त्याच्या सहकाऱ्याला छत्तीसगडच्या वनविभागाने अटक केली. कांकेर जिल्ह्यातील बांदे परिसरात दुचाकीवरून दोन वाघांच्या कातडी नेताना ही कारवाई करण्यात आली.



दरम्यान त्या पोलीस कर्मचाऱ्याच्या अहेरीतील घर-ातून आलापल्ली वनविभागाच्या पथकाने खवले मांजराचे खवले जप्त केले. यावरून अनेक दुर्मिळ वन्यप्राण्यांच्या अवयवांची तस्करी करणाऱ्या रॅकेटमध्ये ते सहभागी असल्याचा ठपका ठेवत त्या पोलीस कर्मचाऱ्याला पोलीस अधीक्षक एम.रमेश यांनी तडकाफडकी निलंबित केले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये बाबूराव राजू मडावी (रा.गडअहेरी, ता.अहेरी, जि.गडचिरोली) आणि बियेश्वर विष्णू गेडाम (रा.अहेरी) यांचा समावेश आहे. वन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उदंती-सीतानदी व्याघ्र प्रकल्प, वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्युरो, राज्यस्तरीय फ्लाइंग स्कॅाड, तसेच आलापल्ली वन विभागाने समन्वय ठेवत या कारवाईत सहभाग घेतला.

तपासादरम्यान आरोपींकडून दोन वाघांची कातडी, १३ वाघांच्या मिशा, एक दुचाकी आणि दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले. प्राथमिक तप-ासात हे वाघ इंद्रावती-अबुझमाड व्याघ्र अधिवासातून मारून त्यांची कातडी छत्तीसगडमध्ये तस्करीसाठी नेली जात असल्याचे निष्पन्न झाल्याचे वन विभागाने म्हटले आहे.

या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध सुरू असून, वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ मधील विविध कलम ांनुसार दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागरिकांनी वन्यजीवांशी संबंधित कोणतीही संशयास्पद माहिती तात्काळ वन विभागाला कळवून वन्यजीव संरक्षणाच्या कार्यात सहकार्य करावे, असे आव-ाहन आलापल्लीचे उपविभागीय वनाधिकारी एस.जी.पवार यांनी केले आहे.

## पावसाळ्यामुळे नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील कोअर क्षेत्रातील जंगल सफारी बंद

**गोंदिया :-** नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्रातील जंगल सफारी व पर्यटन संकुल १ जुलै २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत बंद करण्यात आले आहे. मात्र, व्याघ्र प्रकल्पाच्या बफ र क्षेत्रातील पर्यटन गेट व पर्यटन संकुल नियमितपणे सुरू राहणार असल्याची माहिती उपवनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक पियुषा जगताप यांनी दिली.

यापूर्वी वनविभागाने कोअर क्षेत्रातील पर्यटन गेट व पर्यटन संकुल १५ जून ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत बंद ठेवण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार १६ जून २०२६ पासून ऑफलाईन व वेबसाईटवर ऑनलाईन आरक्षण सुविधा बंद करण्याचे आदेशही जारी करण्यात आले होते. मात्र, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सुधारित आदेश जारी करून १५ जून ऐवजी ३० जून २०२६ पर्यंत पर्यटन सुरू ठेवण्यास मान्यता दिली होती. त्यानुसार कोअर क्षेत्रातील पर्यटन ३० जून २०२६ पर्यंत सुरु ठेवण्यात आले होते.

दरवर्षीप्रमाणे संरक्षित क्षेत्रा-तील पावसाळी हंगामात निसर्ग पर्यटनासंदर्भातील मार्गदर्शक सूचनानुसार कोअर क्षेत्रातील जंगल सफारी व पर्यटन संकुल १ जुलै २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत बंद करण्यात आले आहे. तथापि, बफर क्षेत्रातील पर्यटन गेट व पर्यटन संकुल बंद करण्यात येणार नाही, याची पर्यटकांनी नोंद घ्यावी, असे नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्राच्या उपवनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक पियुषा जगताप यांनी कळविले आहे.

# गोंदिया जिल्ह्यात कर्जमुक्ती योजनेला गती : जिल्हास्तरीय समितीची स्थापना

**गोंदिया:-** शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा लाभ पारदर्शक, सुलभ आणि वेळेत मिळावा यासाठी गोंदिया जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समि तीमुळे योजनेच्या अंमलबजावणीला अधिक वेग आणि शिस्त मिळणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

सदर समितीमध्ये जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक तसेच व्यापारी बँकांचे जिल्हा समन्वयक यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. तर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अर्चना माळवे या सदस्य सचिव म्हणून समितीचे कामकाज पाहणार आहेत.

योजनेच्या अंमलबजावणीवर विशेष लक्ष : ही समिती कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध स्तरांवर समन्वय साधणार आहे. पात्र लाभार्थ्यांची यादी जाहीर करणे, अपात्र घटकांची माहिती पोर्टलवर अपलोड करणे तसेच आधारशी जोडणी न झालेल्या कर्जखात्यांची माहिती प्रसिद्ध करणे यावर विशेष भर दिला जाणार आहे.

शेतकऱ्यांसाठी विशेष उपक्रम : शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण सुलभ करण्यासाठी विशेष मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. याशिवाय, योजनेबाबत व्यापक जनजागृती करून अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तक्रार निवारण आणि पारदर्शकता : शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करणे, बँका व संबंधित विभागांमध्ये सम न्वय राखणे आणि संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता सुनिश्चित करणे ही समितीची प्रमुख जबाबदारी असणार आहे.

शेतकऱ्यांसाठी दिलासा : या समितीच्या स्थापनेमुळे कर्जमुक्ती प्रक्रियेला गती मिळून शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. योजनेचा लाभ कोणत्याही अडचणीशिवाय मिळावा यासाठी प्रशासन कटिबद्ध असून, अंमलबजावणी पूर्ण होईपर्यंत समिती कार्यरत राहणार आहे.

# "न्यायालीन समाधान समारोहह"चे आयोजन २१, २२ व २३ ऑगस्टला

**गोंदिया :-** "न्यायप्रक्रियेत सहभाग' आणि "न्याय आपल्या दारी' या संकल्पनेला मूर्त रुप देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने "समाधान समारोह' या उपक्रमाचे आयोजन केले आहे. या उपक्रमाचा २१ एप्रिल २०२६ पासून प्रारंभ झालेला असून दि.२१, २२ व २३ ऑगस्ट २०२६ रोजी विशेष लोक अदा-लतीमध्ये समारोप होणार आहे.

सदर विशेष लोक अद-ालतीचा उद्देश हा सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा संमती-आधारित निराकरण प्रक्रियेद्वारे सलोख्याने निपटारा करणे हा आहे. यामध्ये सर्व वकील, पक्षकार आणि संबंधित हितधारकांना या उपक्रमात सक्रीय सहभाग घेण्याचे आणि वादांचे प्रभावी निवारण करण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सदर प्रक्रियेत प्रत्यक्ष किंवा आभासी पध्दतीने (ऑनलाईन) पक्षकार उपस्थित राहू शकतात.

यासाठी htts://forms.gle/qxefqF4BCWzukoP6 या गुगल लिंकवर गुगल फॉर्मद्वारे पक्षकार आणि त्यांचे वकील आ-पला अर्ज सादर करु शकतील. यामध्ये सहभागी होण्यासाठी सदर अर्ज htts://www.sci.gov.in या संकेतस्थळावर देखील उप-लब्ध आहे.

अधिक माहितीसाठी जवळच्या विधी सेवा प्राधिकरण अथवा तालुका विधी सेवा समिती यांचेशी संपर्क साधावा. असे सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया यांनी कळविले आहे.

## शेतकऱ्यांसाठी विविध योजनांचा लाभ; कोट्यवधींचे अनुदान वितरण

**गोंदिया :-** राज्यातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी गोंदिया जिल्ह्यात करण्यात येत आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये तीन हप्त्यांमध्ये देण्यात येतात. या योजनेचा २१ वा हप्ता १९ नोव्हेंबर २०२५ रोजी वितरित करण्यात आला असून जिल्ह्यातील २,११,७७३ लाभार्थ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करण्यात आली. राज्य शासनाच्या ङ्गनमो शेतकरी महासन्मान निधीङ्ग योजनेमुळे शेतकऱ्यांना आणखी ६ हजार रुपयांची भर पडत असून, या योजनेचा सातवा हप्ता ९ सप्टेंबर २०२५ रोजी वितरित करण्यात आला आहे.

# जेसीबी जप्त; आता महसूल विभागाच्या कारवाईकडे लक्ष

**नवेगावबांध :-** नवेगावबांध लघु प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात कथित अवैध मुरूम व माती उत्खननप्रकरणी पाटबंधारे विभागाने मध्यरात्री धाड कारवाई केली. या कारवाईत जेसीबी व दोन ट्रॅक्टर जप्त केले. यानंतर आता महसूल विभागाच्या भुमिकेकडे लक्ष लागले आहे. पाटबंधारे विभागाने जप्त केलेली यंत्रसामग्री महसूल विभाग आपल्या ताब्यात घेऊन गौण खनिज चोरीच्या प्रकरणात स्वतंत्र कारवाई करणार का, की हे प्रकरण केवळ कागदोपत्रीच राहणार? अशी चर्चा सुरू झाली आहे.



जांभळी, येलोडी आणि पवनी परिसरातील बुडीत क्षेत्रातून मागील चार दिवसांपासून मोठ्या प्रमाणात कथित मुरुम उपसा करून त्याची विक्री सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने होत होत्या. त्यानंतर पाटबंधारे विभागाने धडक कारवाई करून यंत्रसामग्री जप्त केली. मात्र, या कालावधीत किती ब्रास गौण खनिज बाहेर गेले, शासनाचा किती महसूल बुडाला आणि या संपूर्ण प्रकाराची माहिती संबंधित यंत्रणांना होती का , यावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या प्रकरणात महसूल विभागाची भूमिका सर्वाधिक महत्त्वाची मानली जात आहे. कारण गौण खनिजांच्या अवैध उत्खनन आणि वाहतुकीबाबत स्वतंत्र कारवाई करण्याचे अधिकार महसूल विभागाकडे आहेत. त्यामुळे पाटबंधारे विभागाकडून जप्त करण्यात आलेली जेसीबी आणि ट्रॅक्टर महसूल विभाग आपल्या ताब्यात घेऊन स्वतंत्र पंचनामा, म ोजमाप, रॉयल्टी वसुली, दंडात्मक कारवाई आणि गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू करणार का, याबाबत उत्सुकता वाढली आहे. दरम्यान, अवैध मुरूम उपशाच्या कथित प्रकाराकडे महसूल विभागाचे

## वन्यजीव विभागाची लागणार खरी परीक्षा !

**संबंधित ठिकाण नवेगावबांध अभयारण्याच्या संवेदनशील बफर झोनमध्ये येत असल्याचा दावा केला जात आहे. जर हा दावा सत्य ठरला, तर वन्यजीव विभागालाही स्वतंत्रपणे घटनास्थळाची पाहणी करून कायद्यांनुसार कारवाईसाठी पुढाकार घ्यावा लागणार आहे. या प्रकरणात पर्यावरणीय नुकसान, वन्यजीव अधिवासावर परिणाम आणि संरक्षण क्षेत्रातील नियमांचे उल्लंघन या सर्व बाबींची तपासणी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे वन्यजीव विभागही या प्रकरणाला कशाप्रकारे हाताळते? याची उत्सुकता लागली आहे.**

## तीन विभागाची लागणार कसोटी

**नवेगावबांधमधील हे कथित अवैध उत्खनन प्रकरण आता केवळ एका जेसीबीच्या जप्तीपुरते मर्यादित राहिले नसून, महसूल, पाटबंधारे आणि वन्यजीव विभागाच्या अस्मितेचे ठरले आहे. पाटबंधारे विभागाने सुरू केलेल्या कारवाईला महसूल आणि वन्यजीव विभागाची साथ मिळणार का? की फक्त कागदोपत्री कारवाईचा खेळ खेळून जप्त केलेली यंत्र सोडून दिली जाणार? याकडे लक्ष लागले आहे. की स्वतंत्र कारभार असलेले महसूल व वन्यजीव विभाग आपल्या अधिकाराचा वापर करून गौण खनिज चोरीबाबत स्वतंत्र गुन्हे नोंदविणार, याचे उत्तर पुढील कारवाईतून मिळणार आहेत.**

आतापर्यंत दुर्लक्ष का झाले? सतत तक्रारी होत असताना वेळेत कारवाई का झाली नाही? या प्रकरणात यंत्रणेतील अधिकाऱ्यांचा सहभाग होता का? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# डॉ. गोल्हार यांच्याकडून डोंगरगाव, गंगाझरी उपकेंद्रांना अचानक भेट

**गोंदिया :-** जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा अधिक बळकट करण्यासाठी आणि दुर्गम भागातील नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सेवांचा प्रत्यक्ष दर्जा तपासण्यासाठी गोंदियाचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गोल्हार यांनी नुकतीच डोंगरगाव आणि गंगाझरी येथील आरोग्य उपकेंद्रांना अचानक भेट दिली. या नियोजनबद्ध दौऱ्यादरम्यान त्यांनी राष्ट्रीय लसीकरण मोहीम, साथरोग नियंत्रण आणि उपकेंद्रांमधील विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करून तेथील कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना केल्या. याप्रसंगी त्यांच्यासोबत जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल हे देखील प्रामुख्याने उपस्थित होते.

दौऱ्याची सुरुवात करताना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गोल्हार यांनी डोंगरगाव आणि गंगाझरी येथील लसीकरण केंद्रांना भेट देऊन प्रत्यक्ष कामाची पाहणी केली. तेथे सुरू असलेल्या राष्ट्रीय लसीकरण मोहिमेचा सविस्तर आढावा घेत. ग्रामीण भागातील एकही बालक किंवा माता कोणत्याही परिस्थितीमध्ये लसीकरणापासून वंचित राहणार नाही, याची चोख दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले. तसेच, सद्यस्थितीत उन्हाळा आणि पावसाळ्याच्या संमिश्र पार्श्वभूमीवर उद्भवणाऱ्या डायरिया व डिहायड्रेशन (निर्जलीकरण) सारख्या जलजन्य आजारांवर वेळीच नियंत्रण मि ळवण्यासाठी उपकेंद्रात विशेषत्वाने उभारण्यात आलेल्या "ओ.आर.टी. कॉर्नर'ची त्यांनी बारकाईने पाहणी केली. उपकेंद्रात येणाऱ्या रुग्णांना तातडीने ओ.आर.एस. आणि आवश्यक प्राथमिक उपचार मिळतील, याकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



अचानक घेतलेल्या या भेटी दरम्यान जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गोल्हार यांनी उपकेंद्रातील औषध साठा, हजेरी आणि एकूणच आरोग्य सेवांचा सविस्तर आढावा घेतला. ग्रामीण भागात काम करताना कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडीअडचणी त्यांनी स्वतः जाणून घेतल्या आणि उपस्थित आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व आशा स्वयंसेविकांना पुढील कामासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

# विकसित भारत "जी राम जी" योजनेतून टिकाऊ भौतिक संपत्ती निर्मितीवर भर-जिल्हाधिकारी मंदार पत्की




**गोंदिया :-** विकसित भारत "जी रामजी' योजनेचा शुभारंभ आज देश व राज्य पातळीवर करण्यात आला असून गोंदिया जिल्ह्यातही या योजनेची उत्साहात सुरुवात झाली. या योजनेअंतर्गत निर्माण होणारी भौतिक संपत्ती टिकाऊ, दर्जेदार व दृश्यमान असावी, असे आवाहन जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी केले.

गोंदिया तालुक्यातील सावरी ग्रामपंचायत येथे विकसित भारत रोजगार आणि आजीविका मिशन ग्रामीण ("जी राम जी') या योजनेचा जिल्हास्तरीय शुभारंभ पार पडला. यावेळी आमदार विनोद अग्रवाल, जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ चंद्रा दोंतुला, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजय लोंढे, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपविभागीय अधिकारी चंद्रकांत खंडाईत, तहसीलदार समशेर पठाण, गटविकास अधिकारी जितेंद्र देवरे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पत्की यांनी सांगितले की, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतील त्रुटी दूर करून विकसित भारत गॅरंटी रोजगार आणि आजीविका मिशन ग्रामीण ङ्कजी राम जीफ योजना सुधारित स्वरूपात राबविण्यात येत आहे. ग्रामपंचायतींनी नियोजनबद्ध आराखडे तयार करून कामे करावीत. केंद्र व राज्य शासनाचा निधी ६०:४० या प्रमाणात उपलब्ध होणार असून कुशल व अकुशल कामगारांमध्ये संतुलन साधणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद शाळांचे मॅपिंग सुरू असून भविष्यातील सर्व कामे गुणवत्तापूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे.

**जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी योजना उपयुक्त-आमदार विनोद अग्रवाल**

आमदार विनोद अग्रवाल यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून सुरू झालेली ही योजना रोजगार हमी योजनेची सुधारित आवृत्ती आहे. या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील पायाभूत सुविधा, जलसंधारण, पर्यावरण व आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित कामांना चालना मिळेल. कामाचे दिवस १२५ करण्यात आले असून मजुरांना वेळेत काम व वेतन देण्याची हमी देण्यात आली आहे. या योजनेमुळे कुटुंबातील एकापेक्षा अधिक सदस्यांना रोजगार मिळणार असून सामाजिक अंकेक्षणामुळे कामाच्या गुणवत्तेवर देखील नियंत्रण राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

**समन्वयातून प्रभावी अंमलबजावणीची गरज-लायकराम भेंडारकर**

जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी सांगितले की, या योजनेत सर्व यंत्रणांचा समन्वय साधल्यास गोंदिया जिल्हा विकासाच्या बाबतीत राज्य व देशात आदर्श ठरू शकतो.

**रोजगार निर्मितीला चालना-मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ चंद्रा दोंतुला**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, या योजनेमुळे रोजगार निर्मिती वाढेल व ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. भूजल पातळी सुधारण्यासाठी आणि जलसुरक्षेसाठी विविध कामे हाती घेतली जाणार आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांनी प्रस्तावनेत, योजनेअंतर्गत चार प्रमुख क्षेत्रांवर भर दिला जाणार असल्याचे सांगितले, जलसुरक्षा, ग्रामीण पायाभूत सुविधा, आजीविका विकास आणि हवामान अनुकूल उपक्रम. यामध्ये वृक्षलागवड, विहिरी, गोठे, रस्ते बांधकाम यांचा समावेश आहे. कामाचे ठिकाण पाच कि.मी.च्या परिघात असणे बंधनकारक असून त्यापेक्षा अधिक अंतर असल्यास अतिरिक्त भत्ता देण्यात येईल.

योजनेत पारदर्शकतेसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता व बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर केला जाणार आहे. विकसित भारत २०४७ चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे. दरम्यान, योजनेअंतर्गत हवामान अनुकूल उपक्रमांतर्गत आज ५०० रोपांची लागवड करून अभियानाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कमलेश बिसेन यांनी केले.

# गोंदिया विमानतळ धावपट्टी बांधकाम घोटाळा, विमानतळाच्या सहा.महाव्यवस्थापकाविरुध्द गुन्हा दाखल



**गोंदिया:-** गोंदिया जवळील बिरसी विमानतळावरील धावपट्टी क्रमांक २२ व नागरी बांधकामांमध्ये झालेल्या कथित अनियमिततेप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (उइख) नागपूर भ्रष्टाचार प्रतिबंधक शाखेने मोठी कारवाई केली आहे.बिरसी विमानतळावरील धावपट्टी (Runway) विस्तारीकरण कामात कोट्यवधींचा भ्रष्टाचार केल्याप्रकरणी सीबीआयने (CBI) विमान प्राधिकरणाच्या (AAI) सहाय्यक महाव्यवस्थापक संजीव कुमार सिंग (Sanjeev Kumar Singh) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.सध्या प्रकरणात कुणालाही अटक करण्यात आली नसल्याचे सीबीआयचे एसपी रिषीकेश सोनवणे यांनी म्हटले आहे.

भारतीय विमानतळ प्राधिकरण (अअख)च्या गोंदिया विमानतळावरील एजीएम (इंजिनिअरिंग-सिव्हिल) संजीव कुमार सिंह, मध्य प्रदेशातील बालाघाट येथील एम/एस रायसिंह अँड कंपनी तसेच इतर अज्ञात शासकीय अधिकारी आणि खासगी व्यक्तींविरुद्ध नियमित गुन्हा (Regular Case) दाखल करण्यात आला आहे.सीबीआयच्या प्राथमिक तपासानुसार, बिरसी विमानतळावरील नागरी बांधकामांमध्ये नियमबाह्य पद्धतीने कामे करून शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणात कंत्राट मंजुरी, कामांची अंमलबजावणी, आर्थिक व्यवहार आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्यात येणार आहे.

या गुन्ह्याच्या तपासादरम्यान आणखी काही अधिकारी किंवा खासगी व्यक्तींची नावे समोर येण्याची शक्यता असून, CBIकडून संबंधित कागदपत्रे आणि व्यवहारांची पडताळणी सुरू आहे. तपासाच्या निष्कर्षांनंतरच पुढील कारवाई निश्चित होणार आहे.भारतीय दंड संहिता कलम १२० बी गुन्हेगारी कट रचने,भारतीय दंड संहिता कलम ४२० फसवणूक, कलम ४७७ ए हिशोबात फेरफार,भ्रष्टाचार प्रतिबंधक कलम आदी अन्वये गुन्हा नोंदवण्यात आलेला आहे.

**घोटाळ्याची मुख्य माहिती**

**गैरव्यवहार:** ऑगस्ट २०२३ ते फेब्रुवारी २०२४ दरम्यान धावपट्टीच्या सीमा बांधकामात हा घोटाळा झाला.

**आरोप:** अधिकाऱ्याने कंत्राटदाराशी संगनमत करून मोजमाप पुस्तकात फेरफार केली. निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्याची परवानगी दिली आणि बनावट बिले मंजूर केली. **आर्थिक फसवणूक:** कामाची प्रत्यक्ष किंमत सुमारे ?३.५ कोटी असताना, कंत्राटदाराला १ कोटी १५ लाख २५ हजार ५८८.६१ रुपये अधिकचे दिले असून ?९२.२९ लाख रुपये कंत्राटदाराकडून वसूल करणे बाकी आहे.

# २६ सेवा खंडित हजेरी सहायकांचा पगार ८ वर्षांपासून रखडला

## राजकुमार बडोले यांनी अधिवेशनात वेधले लक्ष




**गोंदिया :-** जिल्ह्यातील २६ सेवा खंडित हजेरी सहायकांच्या दीर्घकाळ प्रलंबित पगाराच्या प्रश्नावर राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री तथा आ. राजकुमार बडोले यांनी पावसाळी अधिवेशनात सभागृहाचे लक्ष वेधत प्रश्न उपस्थित केला. राज्यात सेवा खंडित हजेरी सहाय्यकांना मोठ्या प्रमाणात सेवेत सामावून घेण्यात आले असताना जिल्ह्यातील २६ जणांना ही संधी मिळाली नव्हती. त्यामुळे त्यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आणि शासनाने त्यांना मजूर म्हणून सेवेत घेण्याचे मान्य केले. वर्ष २०१८ मध्ये हे सर्व कामावर रुजू झाले. मात्र, आजपर्यंत त्यांना कोणतेही मानधन मिळालेले नाही.

या सहायकांना हजेरी पत्रक भरून पगार काढण्यास सांगितले जात आहे; परंतु संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन झाल्याने पगार काढणे आता तरी शक्य नाही. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी वारंवार पत्रव्यवहार केला गेला, तरी अद्याप कोणतीही बैठक घेण्यात आली नाही. अधिकाऱ्यांकडन या मध्यावर टाळाटाळ २०२० ते २०२३ या कालावधीत विविध कुशल कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला होता. यापूर्वी ६०:४० चे प्रमाण जिल्हा आणि तालुकापातळीवर राखले जात होते. मात्र, आता हे प्रमाण राज्यपातळीवर राखले जात असल्याने काही जिल्ह्यांमध्ये ते पाळता आले नाही. परिणामी निधी वितरणावर परिणाम झाल्याने या कुशल कामांसाठीचा निधी कसा वितरित करावा, असा प्रश्न उपस्थित आ. बडोले यांनी उपस्थित केला.

केली जात असल्याचे आ. राजकुमार बडोले यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे या २६ जणांचा पगार लवकरात लवकर काढण्यात यावा आणि त्यांना किमान तरी अर्धकुशल कामगार म्हणून पगार देण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. सेवा खंडित हजेरी सहायकांचा प्रश्न सध्या न्यायालयात प्रलंबित असून, न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे अवलोकन करून त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच ६०:४० च्या प्रमाणाच्या प्रश्नावरही योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन मंत्र्यांनी दिले.

# गोमांस विक्रीचा पर्दाफाश; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**देवरी :-** पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर गेल्या अनेक वर्षापासून सुरू असलेल्या अवैध गोमांस विक्रीच्या अड्ड्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने शनिवारी (दि. ४) पहाटेच्या सुमारास धडक कारवाई केली. या कारवाईत दोन सख्ख्या भावांना रंगेहाथ अटक करण्यात त्यांच्याकडून आली. मोठ्या प्रमाणात गोमांस आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार गोपनीय माहितीच्या आधारे, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवारी (दि. ४) पहाटे ५ वाजताच्या सुमारास देवरी पोलिस स्टेशनच्या अगदी समोरच असलेल्या एका ठिकाणावर छापा मारला.जवळ हा प्रकार बरेच दिवसांपासून सुरू असल्याने या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या कारवाईत पोलिसांनी नजीर इस्माईल कुरेशी (वय ५४) आणि कदिर इस्माईल कुरेशी (वय ५२) या दोन भावांना ताब्यात घेतले आहे.

नेया दोघांनी अवैधरीत्या दोन गोवंश प्राण्यांची कत्तल केली होती. आरोपी नजीर इस्माईल कुरेशी व कदिर इस्माईल कुरेशी या आरोपीकडून जप्त केलेले गोमांस विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगून असतानाच पोलिसांनी त्यांना रंगेहाथ पकडले. या प्रकरणी आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत. ही कारवाई गोंदिया गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे यांच्या नेतृत्वाखाली सुरु आहे.

## नंगपुरा मुर्री ग्रामपंचायतचे ७ सदस्य अपात्र, टॅक्स न भरणे भोवले

**गोंदिया:-** तालुक्यातील नंगपुरा मुर्री येथील ७ ग्रामपंचायत सदस्यांनी कर भरणा नोटीस मिळाल्याच्या (९० दिवस) निर्धारीत वेळेत घरटॅक्स व इतर टॅक्सचा भरणा ग्रामपंचायत कार्यालयात न केल्याचे सिध्द झाल्याने जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी २ जुर्ले रोजी त्यांचे सदस्यत्व रद्द केले आहे.

सदर सदस्याविरुध्द सरपंच कविता माधवराव लिचडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली होती.त्या तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या चौकशीनंतर सदर आदेश पारीत करण्यात आलेला आहे.ज्या ७ सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले,त्यामध्ये राजकुमार कैलाश टेकाम,रणदीर मदन शहारे,रवि मुकेश बोमचेर,लीना उमेश पारधी,इंद्रकला ओमप्रकाश पारधी,मंदा दुर्गेश भिवगडे,,राजेश कापसे यांचा समावेश आहे.

# निसर्ग संवर्धनाची प्रेरणादायी सुरुवात :आ.रहांगडाले




**तिरोडा:-** मनिसर्गाचे संवर्धन हीच भावी पिढ्यांसाठीची सर्वात मोठी आणि महत्त्वाची गुंतवणूक आहे. निसर्गाचे महत्व आणि काळानुरून त्यांचे संरक्षण आजघडीला गरजेचे आहे. त्यामुळे निसर्गशाळेचा उपक्रम प्रेरणादायी असून भावी पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादन तिरोडा-गोरेगाव मतदारसंघाचे आमदार विजय रहांगडाले यांनी केले.

नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राच्या वतीने स्थानिक मेरिटोरियस पब्लिक स्कूल, तिरोडा येथे आयोजित मचितमपल्लींची निसर्गशाळाफ या अत्यंत स्तुत्य उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे उ?द्घाटन आमदार विजय रहांगडाले यांच्या हस्ते व इतर प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. उद्घाटन सोहळ्यानंतर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यालय परिसरात भव्य वृक्षारोपण करण्यात आले.

या सोहळ्याला नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राच्या उपवनसंरक्षक पियुषा जगताप, उपसंचालक प्रीतमसिंग कोडापे, गोंदियाचे उपवनसंरक्षक पवनकुमार जोंग, साकोलीचे विभागीय वन अधिकारी अतुल देवकर, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी तुषार ढमढेरे, वनपरिक्षेत्र अधिकारी रविकमल भगत, जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी पवन खंडारे, तसेच मेरिटोरियस पब्लिक स्कूलचे संचालक मुकेश अग्रवाल आदि मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील वन अभ्यासक, जिल्ह्यातील वनाधिकारी, वनरक्षक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी अरण्यऋषी व निसर्गप्रेमी साहित्यिक पद्मश्री स्व. मारुती चितमपल्ली यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये,

शिक्षकांमध्ये तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये वन, वन्यजीव व पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राच्या उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक पियूषा जगताप यांनी माहिती देताना सांगितले की, मागीलवर्षी १६ शाळांमध्ये वन विषयक मार्गदर्शन करण्यात आले होते. मात्र, यावर्षी ममारुती चितमपल्ली निसर्ग शाळाफ उपक्रमांतर्गत तब्बल ५२ शाळांची निवड करण्यात आली असून, या शाळांमधील विद्यार्थ्यांना वर्षभर पर्यावरण बदल, निसर्गाचे महत्त्व आणि वनांविषयी माहिती देऊन त्यांच्या मनात निसर्गाबद्दल गोडवा निर्माण करण्याचे काम वन विभागामार्फत केले जाणार आहे. कार्यक्रमाचे संचालन वनरक्षक संजय अम्बुले यांनी तर उपस्थितांचे आभार सहाय्यक वनपरीक्षेत्र अधिकारी मनीषा चौहान यांनी मानले.

# मनोहर सागर धरणाची पाहणी; यंत्रणेला सतर्कतेचे निर्देश



**गोंदिया :-** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त जिल्हाधिकारी अभिजित घोरपडे यांनी देवरी तालुक्यातील बाघ नदीवरील ङ्कमनोहर सागरफ मध्यम सिंचन धरणाची पाहणी केली. धरणातील जलसाठा, सुरक्षा व्यवस्था आणि एकूण परिस्थितीचा त्यांनी आढावा घेतला.

यावेळी तहसीलदार धनंजय देशमुख व अपर तहसीलदार नवनाथ कातकडे उपस्थित होते. सुमारे १९० दशलक्ष घनमीटर क्षमतेच्या या धरणावर परिसरातील सिंचन व पाणीपुरवठा मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे.

पाहणीदरम्यान धरणाची मुख्य भिंत, सांडवा व तांत्रिक यंत्रणेची तपासणी करण्यात आली. पावसाचे प्रमाण वाढल्यास पूर नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना यंत्रणेला देण्यात आल्या. दरम्यान, धरण प्रशासनाकडून पाणीपातळीवर नियमित देखरेख ठेवली जात असून यंत्रणा सतर्क असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## अवैध दारूविक्रीविरोधात ग्रामस्थांनी पुकारला एल्गार

**गोरेगाव:-**तालुक्यातील म्हसगाव येथे अवैध दारूविक्रीविरोधात ग्रामस्थांनी एल्गार पुकारला आहे. गाव व्यसनमुक्त करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. गावातील अवैध दारूविक्री तत्काळ बंद करण्यात यावी, यासाठी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

अवैध दारूविक्रीमुळे गावातील सामाजिक वातावरण बिघडत असून तरुण व्यसनाधीन होत आहेत. तर कौटुंबिक कलह व महिलांच्या समस्या वाढत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी तातडीने कारवाईची मागणी केली. गावातील काही व्यक्तींकडून कोणताही वैध परवाना नसताना अवैध दारूविक्री केली जात असल्याचा आरोपही नागरिकांनी केला.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा भरपावसात जि.प.वर मोर्चा




**गोंदिया :-** महाराष्ट्र राज्य अंगणवाडी बाल कर्मचारी युनियन आयटक जिल्हा शाखेच्यावतीने शुक्रवारी (दि. ३) भरपावसात विविध मागण्यांसाठी जिल्हा परिषद कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. मोर्चाचे नेतृत्व हौसलाल रहांगडाले, विठा पवार, जिल्हा सचिव पौर्णिमा चुटे, जीवनकला वैद्य, अनिता शिवनकर यांनी केले.आंदोलनात बिरजूला तिडके, अंजना ठाकरे, कांचन शहारे, पुष्पा भगत, शामकला मसराम, पंचशिला शहारे, प्रणिता रंगारी, वीणा गौतम यांच्यासह जिल्हाभरातील अंगणवाडी सेविका सहभागी झाल्या होत्या.

मोर्चाला येथील जयस्तंभ चौकातून सकाळी ११ वाजता सुरुवात झाली. यानंतर हा मोर्चा जि. प.वर धडकला. यावेळी मोर्चात सहभागी अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषद समोर जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर विविध मागण्यांचे निवेदन शिष्टमंडळाच्यावतीने जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी झेनितचंद्रा दोंतुला यांना देण्यात आले. त्यात प्रामुख्याने अंगणवाडी सेविका मदतनीस यांना पेन्शन लागू करण्यात यावी.

ग्रॅज्युइटीचा संपूर्ण लाभ देण्यात यावा अंगणवाडी सेविका कुपोषणमुक्त करतात परंतु त्यांना मेडिकलचा लाभ मिळत नाही. मेडिकल लाभ देण्यात यावा. २०२४ मध्ये मानधन वाढ करण्यात आली होती. परंतु, राज्य शासनाने २ हजार रुपये सेविकांना व एक हजार रुपये मदतनीस यांना प्रोत्साहन भत्त्यामध्ये वर्ग केले. ते सरळ मानधनात वर्ग करण्यात यावे, अंगणवाडी सेविकांना अंगणवाडी अतिरिक्त काम देऊ नये असे वरिष्ठ अधिकारी, मंत्री, आयसीडीएसचे पत्रक असून ही बीएलओची कामे देत आहेत. तर काही ठिकाणी तहसीलदार कारवाईची धमकी देत आहेत हा प्रकार थांबविण्यात यावा. आदी मागण्यांचा समावेश आहे.

# विद्यार्थ्यांअभावी श्रीरामपूरची जि.प.शाळा बंद



**श्रीरामपूर जि. प. शाळेत नवीन शैक्षणिक सत्रात केवळ एका विद्यार्थ्याने प्रवेश घेतला होता. नंतर त्या विद्यार्थ्याने हिरडामाली जि. प. शाळेत प्रवेश घेतल्याने शाळेतील विद्यार्थी संख्या शून्य झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांअभावी ही शाळा बंद करण्यात आली आहे.**

**एम. डी. पारधी, गट शिक्षणाधिकारी, गोरेगाव.**

**गोरेगाव:-** गोरेगाव तालुक्यातील मध्यम प्रकल्प कलपाथरी प्रकल्पग्रस्त नागरिकांचे पुनर्वसन श्रीरामपूर येथे करण्यात आले आहे. येथील पुनर्वसित वसाहतीतील विद्यार्थ्यांसाठी शासनाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उघडून सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या. मात्र, या शाळेत चालू सत्रात विद्यार्थ्यांचे नाव दाखल न केल्याने पटसंख्येअभावी ही शाळा बंद करण्याची नामुष्की आली आहे.

कलपाथरी मध्यम प्रकल्पग्रस्त नागरिकांसाठी गोरेगाव शहरालगत श्रीरामपूर येथे पुनर्वसन वसाहत उभारण्यात आली आहे. या वसाहतीतील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि मोफत शिक्षण मिळावे, यासाठी शासनाने प्रशस्त इमारत, मोठे पटांगण, अंगणवाडी तसेच आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून एक ते चार वर्गापर्यंत जिल्हा परिषद शाळा सुरू केली आहे. परंतु, पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेत दाखल न करता खासगी शाळेत पाठवल्याची चर्चा गावात सुरू आहे.

यावर्षी नवीन शैक्षणिक सत्रात केवळ एका विद्याथ्याने आपले नाव या शाळेत दाखल केले होते. मात्र, त्या विद्यार्थ्याच्या पालकांनी शाळा सोडल्याचे दाखला घेवून हिरडामाली येथील जिल्हा परिषद शाळेत नाव दाखल केले. यामुळे श्रीरामपूर जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी संख्या शून्य झाल्याने शाळा बंद करण्याशिवाय शिक्षण विभागाकडे पर्याय उरला नाही.या पुनर्वसित वसाहतीला गोरेगाव नगरपंचायतीत समाविष्ट करण्यात आले असून प्रभाग क्रमांक एकचा दर्जा देण्यात आला आहे. तरीदेखील, स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरपंचायत प्रशासन आणि नागरिक यांनी शाळा टिकवण्यासाठी आवश्यक प्रयत्न न केल्याची चर्चा परिसरात आहे. विशेष म्हणजे या पुनर्वसन वसाहतीत अनेक राजकीय व सामाजिक क्षेत्रातील नेते वास्तव्यास असूनही शाळा बंद होणे ही दुर्दैवी बाब असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

# देवरी उपविभाग विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेत आघाडीवर



**गोंदिया :-** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत देवरी उपविभागात गणना पत्रकांचे वाटप व डिजिटायझेशनचे काम वेगाने सुरू आहे.शुक्रवार दुपारी २ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार, एकूण २,७०,८११ मतदारांपैकी ५७,९१४ (२१.३९ टक्के) मतदारांना गणना पत्रके वितरित करण्यात आली असून, १,५५८ पत्रकांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे.

तालुकानिहाय प्रगतीत देवरी तालुका ३८.५१ टक्क्यांसह आघाडीवर आहे. सालेकसा तालुक्यात १४.६१ टक्के, तर आमगाव तालुक्यात ११.६६ टक्के वाटप पूर्ण झाले आहे.कामाचा वेग वाढवण्यासाठी अधिकाऱ्यांनी बोरगाव येथे क्षेत्रभेट देऊन बीएलओंसह गृहभेटी घेतल्या व कामाचा आढावा घेतला. प्रलंबित काम तत्काळ पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.प्रशासनाने सर्व मतदारांना गणना पत्रक अचूक भरून आवश्यक कागदपत्रांसह लवकरात लवकर संबंधित बीएलओकडे जमा करण्याचे आवाहन केले आहे.

# जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची बनगाव आरोग्य केंद्राला भेट



**आमगाव :-** 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाच्या निमित्ताने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी तालुक्याचा दौरा करीत विविध आरोग्य केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी केली. या दौऱ्यादरम्यान त्यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना कामात सुधारणा करण्याचे स्पष्ट निर्देश देत, मुख्यालयी राहूनच जनतेला आरोग्य सेवा देण्याचे सक्त आदेश दिले आहेत.या महत्त्वपूर्ण दौऱ्यादरम्यान जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांसोबत जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रोशन राऊत, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी विजय आखाडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. भूमेश पटले यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गोल्हार यांनी ३० जून रोजी तालुक्याला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी आमगाव ग्रामीण रुग्णालय, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, बाम्हणी गाव तसेच बनगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन प्रत्यक्ष कामकाजाची पाहणी केली. सध्या सुरू असलेल्या पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा आढावा घेण्यासाठी त्यांनी थेट नागरिकांच्या घरांना भेट देत मोहिमेच्या प्रत्यक्ष कामाची खात्री केली.

बनगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन त्यांनी सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेतला. यामध्ये त्यांनी राष्ट्रीय क्षयरोग, कुष्ठरोग, सिकलसेल, ॲनिमिया आणि रक्ताची चाचणी या संदर्भातील सद्यस्थिती जाणून घेतली. केंद्रातील ओपीडी, आयपीडी, उपलब्ध औषध साठा, लसीकरण मोहीम, लसींची गुणवत्ता आणि कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेतला. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याच्या कामाचा वैयक्तिक आढावा घेतला व त्यांचे शासकीय रेकॉर्ड तपासले. कामकाजात अचूकता आणि गती आणण्यासाठी त्यांनी रेकॉर्ड अद्ययावत ठेवून कामात सुधारणा करण्याचे आदेश दिले. तसेच उपस्थित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.